जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 4 DEC 2023
पुण्यनगरी

# 'डीकेटीई'स कुलगुरू डॉ. शिर्के यांची सदिच्छा भेट

**रांगोळी : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी डीकेटीईच्या टेक्स्टाईल अॅण्ड इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूटला सदिच्छा भेट दिली आणि पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली. इचलकरंजीमध्ये कार्यक्रमासाठी आले असता संस्थेने त्यांना डीकेटीई कॉलेज भेटीसाठी आमंत्रित केले.

प्रारंभी संस्थेच्या मानद सचिव डॉ. सपना आवाडे यांनी कुलगुरू डॉ. शिर्के यांचे स्वागत केले. प्र. संचालिका डॉ. एल. एस. अडमुठे यांनी डीकेटीईतील नवनवीन शैक्षणिक उपक्रमांची माहिती दिली. नुकतेच राज्य सरकार वस्त्रोद्योग विभाग यांच्याशी वस्त्रोद्योग व्यवसायास चालना देण्यासाठी आणि विद्यार्थी कल्याणासाठी झालेल्या सामंजस्य कराराची माहिती दिली. यावेळी ट्रस्टी शेखर शहा, डे. डायरेक्टर डॉ. यू. जे. पाटील, विभागप्रमुख डॉ. व्ही. आर. नाईक यांच्याशी संवाद साधला. शिक्षण क्षेत्रात होत असलेले बदल व शैक्षणिक संस्थानी अंमलात आणावयाच्या गोष्टी यावर कुलगुरू यांनी विस्तृतपणे चर्चा केली.

4 DEC 2023
जनसंपर्क कक्ष
लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# युवकच येणारा नवभारत घडवतील

## प्रमोद सावंत : शिवाजी विद्यापीठात विशेष व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : देशात सध्या १८ ते २८ या वयोगटातील तरुणाईची संख्या सर्वाधिक आहे. 'आत्मनिर्भर भारत' संकल्पनेत तरुणाईला मोठ्या प्रमाणात केंद्रस्थानी ठेवले आहे. त्यामुळे हे युवकच येणारा नवभारत घडवतील, असा विश्वास गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी शुक्रवारी व्यक्त केला.

'आत्मनिर्भर भारत : युवकांचा सहभाग' या विषयावर शिवाजी विद्यापीठात आयोजित विशेष व्याख्यानात डॉ. सावंत बोलत होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

चंद्रकांत पाटील म्हणाले, नव्या शैक्षणिक धोरणात थेरीपेक्षा प्रॅक्टिलला महत्त्व आहे. यामुळे विद्यार्थ्यांना आपण जे शिकतो त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेता येईल.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, गोव्याचा आदर्श घेऊन स्वयंपूर्णतेकडे जाणे गरजेचे आहे. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी स्वागत केले. नंदिनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

### प्रभावी योजनांद्वारे अवलंबित्व कमी केले

सरकार तुमच्या दारी, स्वयंपूर्ण युवा, स्वयंपूर्ण जेल, ग्रीन स्कूल अशा संकल्पना प्रत्यक्षात अंमलात आणल्या. ग्रामीण भागातील नागरिकांसाठी त्यांच्या मालाला बाजारपेठ मिळवून देण्यासाठी ई-बाजार सुरु केला. यामुळे गोव्यातील नागरिकांना आज दुसऱ्यावर अवलंबून राहावे लागत नसल्याचे डॉ. सावंत यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष

4 DEC 2023 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# युवा संशोधकांनी परिषदांमधील ज्ञानाचा लाभ घ्यावा

कोल्हापूर : राष्ट्रीय परिषदांमध्ये युवा संशोधकांनी जास्तीत जास्त भाग घ्यावा व जगभरात होत असलेल्या नवनवीन संधींची माहिती करून घ्यावी. अशा परिषदांमधील नाविन्यपूर्ण ज्ञानाचा युवकांनी लाभ घ्यावा, असे प्रतिपादन डॉ. सुधींद्रा रायप्रोल (यूजीसी–सीएसआर, मुंबई) यांनी केले. राष्ट्रीय परिषदेच्या सांगता समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

सकाळच्या सत्रामध्ये शिवाजी विद्यापीठ रिसर्च, डेव्हलपमेंट फाउंडेशन (सेक्शन ८ कंपनी) यांच्या विद्यमाने प्रा. बी. एन. थोरात (आय. सी. टी., मुंबई) यांचे इनोव्हेशन, इंक्युबेशन, एंट्रप्रनोरशिप आणि स्टार्टअप इकोसिस्टिम याविषयावर व्याख्यान झाले. तसेच, डॉ. नीतू झा (आय. सी. टी., मुंबई) यांनी कार्बन पदार्थांच्या सहाय्याने पाणी शुद्धीकरणासाठीच्या यंत्रांची माहिती दिली. तसेच, डॉ. एम. व्ही. कुलकर्णी सी– मेट, पुणे यांनी पॉलिमर व त्यांचे कंपोझिट यांचे महत्त्व व्यवहारातील उदाहरणांसह विषद केले. भौतिकशास्त्र विभागप्रमुख प्रा. के. वाय. राजपुरे अध्यक्षस्थानी होते. संयोजक डॉ. एन. एल. तरवाळ यांनी परिषदेतील घडामोडींचा आढावा सादर केला. आभार डॉ. एस. एस. पाटील यांनी मानले . सूत्रसंचालन अश्विनी पाटील यांनी केले.



कोल्हापूर : मार्गदर्शन करताना डॉ. सुधींद्रा रायप्रोल, डावीकडून डॉ. एम. व्ही. टाकळे, परिषदेचे सचिव डॉ. आर. एस. व्हटकर, विभागप्रमुख प्रा. के. वाय राजपुरे, परिषदेचे संयोजक डॉ. एन. एल तरवाळ, डॉ. पाटील

- **डॉ. सुधींद्रा रायप्रोल यांचे प्रतिपादन : भौतिकशास्त्र विभागातील राष्ट्रीय परिषदेची सांगता**

यावेळी वरिष्ठ प्राध्यापक डॉ. विजय फुलारी, प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे, सेक्रेटरी डॉ. आर. एस. व्हटकर उपस्थित होते.

**स्पर्धेतील विजेत्यांचा सन्मान**

परिषदेत झालेल्या मौखिक सादरीकरणामध्ये ऋतुजा गंभीर यांनी प्रथम, सुशांत पाटील यांनी द्वितीय, तर केतन कुमार गायकवाड यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. तसेच, पोस्टर सादरीकरणामध्ये एन. एच. देहकोर्डी यांनी प्रथम, हर्षदा लोखंडे यांनी द्वितीय, तर ऋतुजा गुरव यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. तसेच यावेळी विविध परीक्षकांचा सत्कार करण्यात आला.


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
4 DEC 2023
तरुण भारत

# क्रीडानगरी कोल्हापूरात १० डिसेंबरपासून क्रीडा कुंभमेळा

- खासदार धनंजय महाडिक
- २० स्पर्धांचे करणार आयोजन
- विजेत्यांना २५ लाख रुपयांची रोख रकमेची बक्षीसे मिळणार
- गडहिंग्लजमध्ये रंगणार लावणी महोत्सव, हास्यजत्रा
- १५ जानेवारीला कुंभमेळ्याची सांगता

प्रतिनिधी
कोल्हापूर

खासदार महोत्सवाअंतर्गत प्रथमच कोल्हापूरात क्रीडा कुंभमेळ्याचे आयोजन केले जात आहे. 'चॅम्पियन्स ऑफ कोल्हापूर' हे ब्रीद घेऊन आयोजित केल्या जाणाऱ्या क्रीडा कुंभमेळ्याला १० डिसेंबरला प्रारंभ करुन १५ जानेवारी २०२४ रोजी त्यांची सांगता केली जाईल. या मोठ्या कालावधीत तब्बल २० खेळांच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात येईल. सर्व स्पर्धांमधील यशस्वींचा तब्बल २५ लाख रुपये रोख रकमेची बक्षीसे देऊन गौरव केला जाईल, अशी माहिती खासदार महाडिक यांनी दिली.



क्रीडा कुंभमेळा हा कोल्हापूर जिल्हा मर्यादित आहे. शहरीसह ग्रामिण भागातील खेळाडूंना मैदान उपलब्ध करुन देण्याबरोबरच स्पर्धा, त्यातील टशन आणि ईर्ष्येचा अनुभव मिळावा असा ही क्रीडा कुंभमेळा आयोजनमागे उद्देश आहे, असे सांगून खासदार महाडिक म्हणाले की, सव्वा महिना सुरु राहणाऱ्या कुंभमेळ्यात हॉकी, बास्केटबॉल, टर्फ फुटबॉल, बुद्धिबळ, ज्यूदो, कराटे, शरीरसौष्ठव, वुशू, बॉक्सिंग, रग्बी, तलवारबाजी, मल्लखांब, तायक्वाँदो, जिम्नॅस्टीक, धर्नुविद्या, कुराश, १० वी राज्यस्तरीय डान्स स्पोर्टस्, शालेय राज्यस्तरीय स्पोर्टस् डान्स आदी स्पर्धा होतील. या स्पर्धांसाठी शिवाजी विद्यापीठातील राजमाता जिजाऊ सभागृह, शिवाजी विद्यापीठ क्रीडा संकुल, छत्रपती संभाजी महाराज विभागीय क्रीडा संकुल, मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियम, स्वामी विवेकानंद सभागृह व टाकाळ्यातील भीमा हेल्थ झोन अशी स्थळे निश्चित केली आहे. लेझीम स्पर्धा ही पुणत्रे (ता. पन्हाळा) येथे तर कडगाव (ता. भुदरगड) येथे चिखलगुठ्ठा (बुल ॲण्ड बफेलो ट्रॅडीशनल स्पोर्टस्) स्पर्धा होईल. गडहिंग्लजमधील जनता खुले नाट्यगृहात लावणी महोत्सव व हास्यजत्राचे आयोजन केले जाईल.

महाडिक पुढे म्हणाले की, स्पर्धांसाठी शालेय गट (पहिली ते दहावीपर्यतचे विद्यार्थी-विद्यार्थीनी), महाविद्यालयीन गट, खुला महिला व पुरुष गट असे तीन गट तयार केले आहेत. या गटांमधून स्पर्धांमधील सहभाग निश्चित करण्यासाठी जुने बसंत-बहार चित्रमंदिर अथवा ताराराणी चौकातील धनंजय महाडिक युवाशक्तीच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
4 DEC 2023
लोकमत

# तरच नव्या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी

## डॉ. रमेश कुंभार : नव्या धोरणाची जागृती हवी

कॉलेज कॅम्पस

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : केंद्र सरकारने आणलेले नवे शैक्षणिक धोरण चांगले आहे. यातून विद्यार्थ्याला बहुशाखीय विषयाचे ज्ञान मिळू शकेल. शिवाय थिअरीपेक्षा प्रॅक्टिकलवर अधिक भर दिल्याने विद्यार्थी परिपूर्ण घडणार आहे. मात्र, महाविद्यालयांमधील रिक्त पदांची संख्या पाहता हे धोरण प्रभावीपणे राबविणे कठीण जाणार आहे. यासाठी राज्य सरकारने पहिल्यांदा महाविद्यालयातील रिक्त पदांच्या जागा भरणे गरजेचे आहे, असे मत देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्सचे (डीआरके) प्राचार्य डॉ.व्ही.ए.पाटील यांनी 'लोकमत'शी बोलताना व्यक्त केले.

डॉ. पाटील म्हणाले, केंद्र सरकारने आणलेल्या नव्या शैक्षणिक धोरणामध्ये कौशल्याधारित शिक्षणाला दिलेले महत्त्व नव्या पिढीच्या भविष्यासाठी खूपच उपयोगी पडणार आहे. या धोरणात चार भिंतींमध्ये बसून शिक्षण घेण्यापेक्षा विद्यार्थी, शिक्षकाला फिल्डवर जाऊन अनुभव घेण्याची संधी मिळणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे करिअर सुकर होण्यास मदत होईल. बहुशाखीय पद्धतीचा केलेला अवलंब सर्वांगाने विद्यार्थी घडावेत यासाठी आहे. मात्र, यामुळे महाविद्यालयांवर मोठ्या प्रमाणात ताण आला आहे. वेळापत्रक, नव्याने पायाभूत सुविधा निर्माण करणे हे मोठे आव्हान आहे. यासाठी सरकारकडून कोणताच निधी मिळत नाही. शिवाय, अनेक महाविद्यालयांमध्ये प्राध्यापक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची निम्म्याहून अधिक पदे रिक्त आहेत. जर नवे शैक्षणिक धोरण राबवायचे असेल तर मनुष्यबळ वाढणार आहे. त्यामुळे ही रिक्त पदे भरली तरच या धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी करता येईल.



### विज्ञान शाखा सुरु करणार

पुढील वर्षीपासून डीआरके कॉमर्स कॉलेजमध्ये विज्ञान शाखा सुरु करणार असल्याचे डॉ. पाटील यांनी सांगितले. विविध पातळीवर संशोधन तयार व्हावे, यासाठी विद्यार्थी, शिक्षकांसाठी महाविद्यालयात तीन-चार महिन्यांत संशोधन विकास केंद्र सुरु करणार असल्याचेही ते म्हणाले.

### अधिकार मृगजळच

सरकारने महाविद्यालयांना स्वायत्त होऊन समूह विद्यापीठाकडे जाण्याचा मार्ग दाखविला आहे. त्यासाठी स्वायत्त महाविद्यालयांना अभ्यासक्रम तयार करणे, परीक्षा घेणे हे अधिकार दिले आहेत. मात्र, अनेकदा हे अधिकार केवळ मृगजळ ठरत आहेत. 'यूजीसी'ने महाविद्यालयांना नवनवीन अभ्यासक्रम सुरु करण्याचे अधिकार दिले आहेत. मात्र, विद्यापीठ ते मान्य करीत नाहीत. विद्यापीठाची परवानगी घ्यावी लागत असल्याकडे डॉ.पाटील यांनी लक्ष वेधले.

### वेतनेतर अनुदानही मिळेना

राज्य सरकार पूर्वी स्वायत्त महाविद्यालयांना वेतनेतर अनुदान देत होते. सध्या तेही बंद केले आहे. एकीकडे समूह विद्यापीठाकडे महाविद्यालयांनी वळावे, असे सांगितले जाते, तर दुसरीकडे या महाविद्यालयांना दिल्या जाणाऱ्या वेतनेतर सेवासुविधा बंद केल्या जात आहेत. त्यामुळे स्वायत्त होण्यास, समूह विद्यापीठांमध्ये जाण्यास कोणते महाविद्यालय तयार होईल? असा सवाल डॉ. पाटील यांनी व्यक्त केला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 3 DEC 2023

पुण्यनगरी

# फार्मसी महाविद्यालयातील शिक्षकांचे शिबिर

## भारती विद्यापीठातर्फे आयोजन

कोल्हापूर : प्रतिनिधी

भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी येथे शिवाजी विद्यापीठ पुरस्कृत फार्मसी महाविद्यालयातील शिक्षकांसाठीचे प्रशिक्षण शिबिर उत्साहात झाले. शिबिराचे उद्‌घाटन भारती विद्यापीठाच्या सांगली विभागीय कार्यालयाचे मानद संचालक डॉ. एच. एम. कदम, भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. एच. एन. मोरे, उपप्राचार्य डॉ. एम. एस. भाटिया, डॉ. एन. एम. भाटिया, डॉ. एस. आर. काणे, बी. एस. वर्णे, एस. एम. होनमाने, आर. पी. ढवळे, एस. पी. रोचलाणी यांच्या हस्ते डॉ. पतंगराव कदम यांच्या प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलनाने झाले.

यामध्ये कॉम्प्युटर ॲडेड ड्रग डिझाईन बी.फार्म. अंतिम वर्ष सेमिस्टर आठचा विषय शिकवणाऱ्या आणि क्वॉलिटी मॅनेजमेंट सिस्टीम हा विषय एम.फार्म प्रथम वर्ष शिक्षकांसाठी आयोजित करण्यात आला होता. समन्वयक म्हणून व्ही. टी. पवार, टी. व्ही. चव्हाण यांनी काम पाहिले. यामध्ये सुमारे ७० शिक्षकांनी सहभाग नोंदवला. सूत्रसंचालन पी. बी. वर्णे यांनी केले. आभार पी. के. माने यांनी मानले.